संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ६२५/२०२५

महाराष्ट्र शासन/भुराबाई

<u>निशाणी क्र. ११</u>

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०१ ची जबानी शपथेवर सुरू...</u>**

**मी ईश्वराला स्मरून शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपूर्ण खरे सांगेन व ख-याशिवाय काहीही सांगणार नाही.**

**साक्षीदाराचे नाव : तानाजी रामराव पवार,**
**वय** : २५ वर्षे,
**व्यवसाय** : मजुरी,
**पत्ता** : रा. घारगाव, ता. कळंब, जि. धाराशिव

**<u>साक्षीदार क्र. ०१ चा सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. टी. वैदय यांचे मार्फत</u>**

१. दिनांक ११/०७/२०२५ रोजी राज्य उत्पादन शुल्क पोलिसांनी मला पंचनाम्याकरीता बोलाविले नव्हते. मी शिराढोण येथील शिवाजी चौक येथे थांबलो असताना पंचनाम्यावर सही घेतली. आता मला अभिलेखावरील घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. घटनास्थळ पंचनाम्यावरील अनुक्रमांक २ वर माझी सही आहे. त्यातील मजकूराबाबत मला काही माहिती नाही. सहीस ओळखीपुरता **<u>निशाणी क्र.१२</u>** देण्यात येतो.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्याने सरकारी वकिलांनी साक्षीदारास उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)**

२. हे म्हणणे खरे नाही की, मला राज्य उत्पादन शुल्क पोलिसांनी दिनांक ११/०७/२०२५ रोजी आरोपी महिलेच्या ताब्यातून घारगाव तांडा येथे आरोपीच्या राहते घरासमोरील असलेल्या पत्रयाच्या शेडमध्ये पंचनाम्यासाठी बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी व दुसरा पंच नामे शामराव हरिभाउ पवार यांचेसह पोलीसांनी छापा मारला होता. हे म्हणणे खरे नाही की, तेथे एक इसम बेकायदेशीररीत्या विनापास परवाना दारू विक्री करत असताना मिळून आला. त्याला त्याचे नाव विचारले असता तिने तिचे नाव भुराबाई बालू पवार असे सांगितले. आरोपीचे ताब्यात १. २०० लिटर क्षमतेच्या ०५ प्लास्टीकच्या बॅरेलमध्ये अंदाजे १,००० लीटर रसायनची प्लास्टीक बॅरलसह अंदाजे

किंमत २४,०००/-, २. २०० लीटर क्षमतेच्या दोन लोखंडी भट्टी बॅरलची अंदाजे ३०० लीटर रसायनची भट्टी बॅरलसह अंदाजे किंमत १२,५००/- असा एकूण ५१,०००/- किंमतीचा मुद्येमाल मिळून आला. हे म्हणणे खरे नाही की, तेथे पोलीसांनी माझेसमक्ष १८० मि.ली.क्षमतेच्या पंचांच्या सहया असलेले लेबल असलेली एक बाटली रासायनिक विश्लेषणाकरीता वेगळी काढली. हे म्हणणे खरे नाही की, तेथे पोलीसांनी माझेसमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा करून मला वाचून दाखवून त्यावर माझी सही घेतली.

३. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी ही माझया ओळखीची असल्यामुळे तिला वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे सन्माननीय विधीज्ञ श्री. ए. सी. चोंदे यांनी नाकारला.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**

सही/-

**दिनांक: १६.०७.२०२६**
**ठिकाण: कळंब**

**(अमृता डी. जाधव)**
**न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,**
**(कोर्ट क्र.३)कळंब.**